सत्यमेव जयते

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प


महाराष्ट्र शासन– कृषि विभाग

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प

३० अर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई ४०० ००५

दूरध्वनी क्र. – ०२२-२२१६३३५१ ई-मेल – mahapocra@gmail.com


**जा.क्र. नादेकृसंप्र-०१२५/ प्र.क्र.५१/ मृदाविद्यान/१९२/२०२५** **दिनांक: २५/०२/२०२५**

**प्रति,**

**१. विभागीय कृषी सह संचालक, छ.संभाजीनगर, लातूर, अमरावती, नागपूर, नाशिक.**

**२. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (प्रकल्प टप्पा-२ मधील सर्व जिल्हे)**

**३. प्रकल्प संचालक (आत्मा) (प्रकल्प टप्पा-२ मधील सर्व जिल्हे)**

**विषय – मार्गदर्शक सूचना – नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा-२ अंतर्गत लोकसहभागीय सूक्ष्मनियोजन करून गावस्तरीय हवामान अनुकूलन आराखडा तयार करणे ...**

संदर्भ – १. कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्र. नादेकृ ४६२२/प्रक्र-९४/८अ, दि.१४.१०.२०२४

२. या कार्यालयाकडील पत्र क्र नादेकृसंप्र २- १२२४/ मृदाविद्या/ प्र क्र १३३/ १०८८ दि. १८.१२.२०२४

३. कृषि आयुक्तालयाकडील पत्र क्र. मृदसं/ मृद-१/ नादेकृसंप्र/ २८०६७/ २०२४ दि. २७.१२.२०२४

४. मा. प्रकल्प संचालक यांच्या अध्यक्षतेखालील online बैठक दि. १०.१.२०२५ चे इतिवृत्त

५. या कार्यालयाकडील पत्र क्र. नादेकृसंप्र-०१२५/ प्र क्र ०१/ कृ अ/ ६०/ २०२५ दि. १७.१.२०२५

६. या कार्यालयाकडील पत्र क्र. नादेकृसंप्र-०१२५/ प्र क्र / मृ वि/ १३७/ २०२५ पेसा दि. ७.२.२०२५

महाराष्ट्र शासन आणि जागतिक बँकेच्या मान्यतेने राज्यातील मराठवाडा, विदर्भातील सर्व १९ जिल्हे आणि उत्तर महाराष्ट्रातील नाशिक व जळगाव अशा २१ जिल्ह्यांत नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा-२ राबविण्यात येत असून सदर प्रकल्पांतर्गत गावांची निवड संदर्भीय शासन निर्णयाद्वारे करण्यात आलेली आहे. प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरिता सदर गावांचे लोकसहभागीय पद्धतीने सूक्ष्मनियोजन करून गावस्तरीय हवामान अनुकूलन आराखडा तयार करणे आवश्यक आहे. याकरिता करावयाच्या लोकसहभागीय सूक्ष्मनियोजन प्रक्रिया विषयक मार्गदर्शक सूचना सहपत्रित करण्यात येत आहेत. त्याचे अवलोकन व्हावे व त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी. लोकसहभागीय सूक्ष्मनियोजन प्रक्रिया गावात सूलभतेने राबविण्यासाठी पुढील सूचनांचे पालन करावे.

**१.** शासन निर्णयामध्ये नमूद महसूल गावांमध्ये आणि प्रकल्पातील पेसा क्षेत्रातील घोषित गावांत ४ स्वयंसेवकांची संदर्भीय पत्र ५ अन्वये देण्यात आलेल्या सुचनांनुसार त्वरीत निवड करण्यात यावी. यामध्ये कमीतकमी ५० टक्के महिला स्वयंसेवक असाव्यात.

२. सूक्ष्मनियोजनासाठी प्रत्येक उपविभागास एक याप्रमाणे उपविभागिय कृषि अधिकारी कार्यालयात सूक्ष्मनियोजन समन्वयक **याची चार** महिन्यांकरिता मानधन तत्त्वावर नेमणूक करण्यात यावी. सदर कार्यवाही जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांचेस्तरावरून करण्यात यावी.

३. लोकसहभागीय पद्धतीने सूक्ष्मनियोजन प्रक्रिया विषयक प्रशिक्षण रामेति, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, नाशिक, नागपूर येथे नियोजित केले असून, त्याकरिता नेमून दिलेल्या वेळापत्रकानुसार अधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षण संस्थेमध्ये उपस्थित राहण्यास्तव कार्यमुक्त करावे.

४. दिनांक १७ मार्च २०२५ पासून प्रत्येक उपविभागामध्ये प्रथम एक प्रकल्प गाव निवडून तेथे सूक्ष्म नियोजन समन्वयकांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्यक्ष सूक्ष्मनियोजन प्रक्रिया राबविण्यात यावी, आणि तेथे संबधित उपविभाग/ तालुक्यातील प्रकल्पाशी संबधित एकूण कृषी सहाय्यक, कृषी पर्यवेक्षक आणि मंडळ कृषी अधिकारी यांचेपैकी ५० % अधिकारी/कर्मचारी सदर प्रक्रियेचे निरीक्षण आणि सहभागीय तंत्रांचा सराव करण्याच्या उद्देशाने उपस्थित राहतील याची दक्षता घ्यावी. अशाच प्रकारे त्यापुढच्या आठवड्यात आणखी एका गावाची फेरी पूर्ण करावी, जेणेकरून प्रकल्पाशी संबधित सर्व कृषी सहाय्यकांना व अधिकाऱ्यांना सरावाची संधी मिळेल.

५. वरील दोन्ही फेऱ्यानंतर प्रत्येक कृषी सहाय्यकाने त्यांचे प्रत्येक प्रकल्प गावामध्ये सोबतच्या मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करून सूक्ष्म नियोजन पूर्ण करावे आणि हवामान अनुकूलन अराखाडे तयार करावेत याबाबत आपल्या स्तरावरून सनियंत्रण करण्यात यावे.

६. तालुका कृषी अधिकारी यांनी गावनिहाय निवड केलेल्या स्वयंसेवकांचे मंडळ/तालुकास्तरावर एक दिवसीय कार्यशाळा घ्यावी आणि त्यांचा सूक्ष्म नियोजन प्रक्रियेमध्ये सक्रीय सहभाग राहील असे नियोजन करावे.

७. प्रशासक कार्यरत असलेल्या गावांचे देखील सूक्ष्म नियोजन करून आराखडे तयार करावेत.

८. पेसा गावांमध्ये दि. ७.२.२०२५ च्या पत्रान्वये देण्यात देण्यात आलेल्या सूचनानूसार सूक्ष्म नियोजन प्रक्रिया राबविण्यात यावी.

सूक्ष्म नियोजन करून संपूर्ण प्रकल्प गावांचे आराखडे दि. ३० जून २०२५ पर्यंत मंजूर करून घेण्यात यावेत.

Parimal 25/12

**प्रकल्प संचालक**

**नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, मुंबई**

**प्रत, माहितीसाठी**

१. आयुक्त, कृषि, कृषि आयुक्तालय, म. रा., पुणे
२. कृषी संचालक (सर्व), कृषी आयुक्तालय , पुणे

**प्रत- कार्यवाहीस्तव अग्रेषित**

१. उपविभागीय कृषि अधिकारी, (प्रकल्पातील सर्व ५५ उपविभाग)
२. तालुका कृषी अधिकारी (प्रकल्प जिल्ह्यातील २२४ तालुके)

# लोकसहभागीय पद्धतीने सूक्ष्मनियोजन करून

# गावस्तरीय हवामान अनुकूलन आराखडा तयार करणे

## १. प्रस्तावना:

हवामान बदलाचा राज्याच्या शेतीवर विपरीत परिणाम दिसून येत असून, भविष्यात देखील सदर परिणामांची व्याप्ती वाढणार असल्याचे राज्याच्या हवामान बदलाविषयक कृती आराखडयामध्ये नमूद केले आहे. मराठवाडा व विदर्भातील शेतक-यांना गेल्या काही वर्षांपासून दुष्काळास सामोरे जावे लागत असून भू-गर्भातील पाणीसाठयावर व जमिनीच्या आरोग्यावर विपरित परिणाम होत आहे. परिणामी शेतीमधील पिकांची उत्पादकता घटत आहे. या प्रतिकूल परिस्थितीमध्ये अल्पभूधारक शेतक-यांच्या उत्पादनावर विपरीत परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे. हवामान बदलामुळे उद्भवलेल्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास शेतक-यांना सक्षम करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाचा जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाचा दुसरा टप्पा सुरु करण्यात आलेला आहे.

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा-२ विदर्भातील ११ जिल्हे, मराठवाड्यातील ८ जिल्हे आणि उत्तर महाराष्ट्रातील जळगाव व नाशिक या २१ जिल्ह्यांमधील ७२०१ गावांमध्ये प्रकल्पाची अंमलबजावणी कृषि व पदुम विभागाकडील शासन निर्णय दि. १४.१०.२०२४ अन्वये करण्यात येत आहे. सदर गावांमध्ये लोकसहभागीय सूक्ष्मनियोजन प्रक्रिया राबविण्याची आहे. यापैकी गावे उजाड/ रीठ/ बेचिराख म्हणून गणली गेली आहेत परंतु सदर गावांत पाणलोट उपचारांची कामे घेणे आवश्यक असल्यास सदर गावांचा देखील सूक्ष्मनियोजन प्रक्रियेत समावेश करावयाचा आहे.

प्रकल्प गावांमध्ये हवामान अनुकूल शेतीसाठी शेतकऱ्यांच्या गरजेनुसार वैयक्तिक शेतीमध्ये सुधारणा करण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येते तसेच गावातील शेतकरी व महिला गटांना कृषी पूरक व्यवसायासाठी प्रेरित करण्यात येते. याशिवाय गावातील नैसर्गिक संसाधनांचा अभ्यास करून मृद व जलसंधारण कामांसाठी अर्थसहाय्य देण्यात येते. यासाठी शेतीविषयक आधुनिक तंत्रज्ञान, पाण्याचा कार्यक्षम वापर वाढविण्यासाठी उपाययोजना, जमिनीची सुपीकता वाढविण्याचे उपाय, शेतीमधील कर्ब उत्सर्जन कमी करण्याचे उपाय, शेतीमध्ये कर्बग्रहण वाढविण्याचे उपाय, संवर्धित शेती पद्धती, पौष्टिक तृणधान्य उत्पादनावर भर, हवामान अनुकूल तंत्रज्ञानाचा प्रभावी अवलंब इ. बाबींवर भर देण्यात येत आहे. बदलत्या हवामानास तोंड देण्यासाठी या प्रमुख बाबींचा प्रत्येक प्रकल्प गावामध्ये अवलंब होणे गरजेचे आहे. परंतु प्रत्येक गावाची भौगोलिक, कृषी हवामान विषयक तसेच सामाजिक रचना वेगळी असल्याने त्यांच्या शेतीमध्ये करावयाचे बदल वेगवेगळ्या पद्धतीचे असू शकतात. सदर बाब लक्षात घेवून गावनिहाय गरजा निर्धारीत करण्यासाठी

लोकसहभागीय पद्धतीने सूक्ष्मनियोजन करणे आवश्यक आहे. म्हणून प्रकल्पातील सर्व गावांचे लोकसहभागीय सूक्ष्म नियोजन करून प्रत्येक गावाचा **“गावस्तरीय हवामान अनुकूलन आराखडा”** (Village Adaptation Plan- VAP) तयार करावयाचा आहे.

गावगावांतील स्थानिक शेतकरी व त्याचे शेतीतील प्रश्न हे अतिशय क्लिष्ट व गुंतागुंतीचे आहेत, त्याचप्रमाणे हवामान बदलामुळे निर्माण झालेले प्रश्न त्याला अधिक गहन बनवतात. त्यांना तोंड देण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन काम करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने प्रभात फ़ेरी, संसाधन नकाशा, शिवार फ़ेरी, लक्षगट चर्चा इत्यादी लोकसहभागीय तंत्रांचा वापर करून प्रकल्पाची सूक्ष्मनियोजन पद्धती निश्चित करण्यात आलेली आहे. या तंत्रांचा वापर करून सद्य:स्थितीची पाहणी व त्या आधारे प्रकल्प घटकांचे नियोजन करण्यास सहाय्य होते. याद्वारे प्रकल्प गावांचे सूक्ष्मनियोजन केल्याने गावातील सर्व संवर्गातील लोकांच्या शेतीविषयक गरजा / प्रश्न जाणून घेऊन त्यावर शास्त्रशुद्ध पद्धतीने शाश्वत उपाययोजना करणे शक्य होणार आहे. आणि सदर सूक्ष्म नियोजनातून तयार झालेल्या गावस्तरीय अनुकूलन आराखड्यास महिला सभा व ग्रामसभा यांची संमती घेणे अभिप्रेत आहे. लोकसहभागीय सूक्ष्म नियोजनासाठी राबवण्याच्या प्रक्रियेचा उद्देश आणि इतर तपशील खालीलप्रमाणे सविस्तर मार्गदर्शक सूचनांमध्ये देण्यात आलेला आहे. सदर सूचनांचा अवलंब करून लोकसहभागीय सूक्ष्मनियोजन प्रक्रिया राबबावी.

**<u>२. उद्देश :</u>**

१. हवामान बदलांमुळे शेतीवर होणा-या परिणामांबाबत गावातील शेतकरी व इतर सामाजिक घटकांमध्ये जाणीव जागृती निर्माण करणे

२. पाण्याच्या ताळेबंदाच्या आधारे नैसर्गिक साधन संपत्तीचा आणि पीकपद्धतीचा आराखडा तयार करणे

३. हवामान अनुकूल तंत्रज्ञान अवलंबण्याबाबतचा आराखडा तयार करणे

४. शेतीतून होणारे कर्ब उत्सर्जन कमी करण्याचे आणि जमिनीतील सेंद्रिय कर्ब वाढविण्याचे नियोजन करणे

५. शेतकरी, युवक आणि महिलांचा सहभाग वाढवून शेतीच्या कामांमध्ये सांघिकपणा वृद्धिंगत करणे

६. उत्पादित शेतमालाच्या मुल्यसाखळीचे बळकटीकरणासाठी आवश्यक उपाय प्रस्तावित करणे

७. प्रस्तावित उपाय/ कामे समाविष्ट करून गावस्तरीय हवामान अनुकूलन आराखडा (Village Adaptation Plan) तयार करणे

## ३ : लोकसहभागीय पद्धतीने सूक्ष्मनियोजन करण्याची कार्यपद्धती –

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत गावांचा हवामान अनुकूलन आराखडा तयार करण्यासाठी लोकसहभागीय सुक्ष्मनियोजनातील टप्पे पुढीलप्रमाणे आहेत.

**सूक्ष्मनियोजन प्रक्रियेचे टप्पे –**

सूक्ष्मनियोजन विषयक कामकाज पार पाडावयाची जबाबदारी **उपविभागीय कृषि अधिकारी** यांची राहील. प्रकल्प गावांत लोकसहभागीय सूक्ष्मनियोजन प्रक्रिया पार पाडून त्या आधारे **गावस्तरीय हवामान अनुकूलन आराखडा तयार करण्याची जबाबदारी संबंधित कृषि सहाय्यक यांचेवर राहील.** प्रकल्पामार्फ़त सूक्ष्मनियोजन प्रक्रिया व पाण्याचा ताळेबंद विषयक माहिती संकलित करण्यासाठी अनुक्रमे MLP App व Water Budget App उपलब्ध करून दिलेले आहे.

गावस्तरावर सूक्ष्मनियोजन प्रक्रिया खालील चार टप्प्यात विभागण्यात आलेली आहे.

अ. सूक्ष्मनियोजन प्रक्रिया नियोजन

ब. प्रत्यक्ष सूक्ष्मनियोजन प्रक्रियेदरम्यान करावयाची कार्यवाही

क. ग्रामसभेने मंजूर केलेल्या आराखड्यावरील कार्यवाही

ड. गावस्तरीय हवामान अनुकूलन आराखड्यास जिल्हा समन्वय समितीची मंजूरी

**अ. सूक्ष्मनियोजन प्रक्रिया नियोजन**

१. **कृषी सहाय्यकांचे प्रशिक्षण**: प्रकल्पांतर्गत गावांचे कृषी सहाय्यकांचे ३ दिवसीय प्रशिक्षण प्रादेशिक कृषी विस्तार व्यवस्थापन संस्था (रामेती) येथे पूर्ण करून घेण्यात यावे. यासाठी विहित वेळापत्रकानुसार प्रकल्पातील कृषी सहाय्यकांना प्रशिक्षणासाठी कार्यमुक्त करण्यात यावे. सदर प्रशिक्षण यशदा, पुणे यांचेकडील प्रशिक्षित सूक्ष्मनियोजन प्रशिक्षकांमार्फत देण्यात येणार आहे.

२. **सूक्ष्मनियोजन समन्वयक यांची नेमणूक करणे**: शासकीय योजनांतर्गत सूक्ष्मनियोजन, गाव विकास आराखडा तयार करणे या क्षेत्रामध्ये अनुभव असलेल्या व्यक्तीची प्रत्येक उपविभागास एक या प्रमाणे उपविभागिय कृषि अधिकारी कार्यालयांतर्गत सूक्ष्मनियोजन समन्वयक म्हणून कमाल **चार** महिन्यांकरिता मानधन तत्त्वावर नेमण्यात यावेत. सूक्ष्मनियोजन समन्वयकांच्या जबाबदा-या व मानधन विषयक माहिती परिशिष्ट-१ मध्ये देण्यात आलेली आहे.

३. **सूक्ष्म नियोजन वेळापत्रक तयार करणे:** उपविभागीय कृषि अधिकारी यांचे अधिनस्त कार्यरत असलेले कृषि सहाय्यक आणि सूक्ष्मनियोजन गावे संख्या विचारात घेऊन उपविभागामधील सूक्ष्मनियोजन पूर्ण करण्यासाठी वेळपत्रक तयार करावे. कृषी सहाय्यकांचे सजामधील प्रकल्प गावे सूक्ष्म नियोजनासाठी सलगपणे नेमून देण्यात यावीत. **कृषि सहाय्यकनिहाय तयार केलेले वेळापत्रक MLP Dashborad वर भरावे.**

४. एका गाव समुहातील समाविष्ट गावांची सूक्ष्मनियोजन प्रक्रिया सलग दिवसांत पूर्ण करणे अभिप्रेत आहे. प्रत्येक कृषि सहाय्यकास एका गावाचे सूक्ष्मनियोजन पूर्ण **करण्यासाठी ५ दिवस आणि उर्वरित माहितीचे संकलन करून** MLP App **मध्ये भरणे तसेच संकलित माहितीचे विश्लेषण करणे यासाठी २ दिवस** असा एक आठवड्याचा कालावधी निर्धारीत केलेला आहे.

५. पेसा ग्रामपंचायतीमधील सर्व पेसा गावांमध्ये स्वतंत्र सूक्ष्मनियोजन प्रक्रियेचे नियोजन करावे. याविषयीच्या मार्गदर्शक सूचना दि. ०७/०२/२०२५ चे पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत.

६. **स्वयंसेवकांना प्रक्रियेबाबत अवगत करणे**: या कार्यालयाकडील पत्र दि. १७.१.२०२५ अन्वये मृद व जलसंधारण प्रक्रियेकरिता **निवडण्यात आलेल्या ४ स्वयंसेवकांना सूक्ष्मनियोजन** प्रक्रियेमध्ये सक्रीय सहभाग घेण्याबाबत सूचित करावे व त्यांना वेळापत्रक अवगत करावे.

७. सुक्ष्मनियोजनाकरिता माहिती पुस्तिका, नकाशे, लेखन साहित्य,सूक्ष्म नियोजन प्रक्रिया वेळापत्रक, प्रभातफ़ेरी, या करिता बॅनर, इ. गावस्तरावर उपलब्ध करून द्यावे. माहितीपुस्तिकेमध्ये सूक्ष्म नियोजन मार्गदर्शक सूचना, सूक्ष्मनियोजन प्रक्रियेमध्ये राबवावयाची तंत्रे व उपक्रम, गावस्तरीय हवामान अनुकूलन आराखडा प्रपत्र याचा समावेश असावा. प्रकल्प टप्पा-२ च्या गावांकरिता गावाची सर्वसाधरण माहिती नकाशा (सर्वे क्रमांक सहित) - Village Base Map (With Survey Numbers), पाणलोट क्षेत्र उपचार नकाशा - Watershed Treatment Map, जमिनीचा वापर नकाशा - Land Use Map हे तीन नकाशे प्रकल्पाच्या www.mahapocra.gov.in / वर उपलब्ध आहेत. **त्याची A३ आकाराची रंगीत प्रत कृषि सहाय्यकांना उपलब्ध करून द्यावी. सदर साहित्य सूक्ष्मनियोजन प्रक्रियेच्या किमान ७ दिवस आगोदर कृषि सहाय्यक यांना छापून देण्यात यावे.**

८. प्रकल्पांतर्गत सूक्ष्मनियोजन करावयाच्या गावांचे संबंधित कृषि सहाय्यक यांनी गावासंबंधी **मुलभूत माहिती संकलित करून प्रत्यक्ष सूक्ष्मनियोजन प्रक्रियेपूर्वी किमान ७ दिवस अगोदर** MLP App मध्ये भरावी.

**९. सूक्ष्म नियोजन प्रक्रियेपूर्वी किमान ७ दिवस अगोदर कृषि सहाय्यक यांनी प्रकल्प गावातील लोकसंख्या, जनावरे व पीक रचना याबाबतची माहिती प्रकल्पाने विकसित केलेल्या Water Budget App मध्ये भरून पाण्याचा ताळेबंद तयार करावा**

१०. उपविभागीय कृषि अधिकारी यांनी सूक्ष्मनियोजन वेळापत्रक संबंधित ग्राम कृषि विकास समिती व ग्रामपंचायतींना लेखी कळवावे. सूक्ष्मनियोजन वेळापत्रक कृषि सहाय्यकाने गावात दर्शनी भागात प्रसिद्ध करावे. त्याशिवाय वेळापत्रकास वृत्तपत्रातून वेळोवेळी प्रसिद्धी देण्यात यावी.

११. सूक्ष्मनियोजन वेळापत्रकानुसार ग्रामसभेची नोटीस विहीत मुदतीत (सात दिवस अगोदर) देणे आवश्यक असल्याने वेळापत्रक पुरेसा कालावधी ठेवूनच देण्यात यावे.

१२. गावातील नैसर्गिक संसाधने, शेती, वनक्षेत्र, पशुधन, इ. बाबत अधिक माहिती असणा-या व्यक्तींचा ग्राम संसाधन चमू तयार करावा.

१३. संबंधित ग्राम कृषि विकास समिती, ग्राम संसाधन चमू, शासकीय कर्मचारी व स्वयंसेवक यांची बैठक आयोजित करण्यात यावी. या बैठकीमध्ये सूक्ष्मनियोजन प्रक्रियेदरम्यान अवलंब करावयाची विविध तंत्रे व उपक्रम याची माहिती देण्यात यावी.

१४. मातीचे नमुने प्रत्येक शिवार फ़ेरीच्या दरम्यान दोन याप्रमाणे एकूण ४ नमूने घ्यावयाचे आहेत. त्याकरिता आवश्यक संख्येनुसार पिशव्या कृषि सहाय्यक यांना उपलब्ध करून द्याव्यात.

**१५. लोकसहभागीय सूक्ष्मनियोजन वेळापत्रक**

| **दिवस** | **सकाळचे सत्र** | **दुपारचे सत्र** | **सायंकाळचे सत्र** |
|---|---|---|---|
| **शुन्य** | -- | ०.२.१ **स्वयंसेवक** आणि **ग्राम कृषि विकास समितीची भेट**<br>**उपस्थिती-** सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्राम कृषि विकास समिती सदस्य, सूक्ष्मनियोजन स्वयंसेवक | **०.३.१ मशाल फ़ेरी व**<br>**०.३.२ गाव बैठक**<br><br>**उपस्थिती-** ग्राम कृषि विकास समिती सदस्य, स्वयंसेवक, कृषिताई, ग्रामपंचायत सरपंच व सदस्य, गाव स्तरावरील विविध शासकीय कर्मचारी, ग्रामस्थ |

| दिवस | सकाळचे सत्र | दुपारचे सत्र | सायंकाळचे सत्र |
|---|---|---|---|
| पहिला | **१.१.१ प्रभात फेरी**<br>**उपस्थिती:** मुख्याध्यापक, शाळेतील विद्यार्थी, शाळा व्यवस्थापन समिती, शेतकरी, स्वयंसेवक, कृषिताई, स्थानिक कर्मचारी<br><br>**१.१.२ गाव नकाशा** - उपलब्ध सामाजिक व आर्थिक माहितीची पडताळणी करणे<br>**उपस्थिती-** स्वयंसेवक, ग्राम कृषि विकास समिती सदस्य, संसाधन गट, शेतकरी, स्थानिक पातळीवरील कर्मचारी | १.२.१ **कृषि विषयक महत्वाच्या बाबी व हवामान अनुकूलतेवर लक्ष्यगट चर्चा**<br><br>**उपस्थिती-** शेतकरी, ग्राम कृषि समिती सदस्य, वनपाल, कृषिताई, स्वयंसेवक, ग्राम विकास समिती सदस्य | १.२.३ **हवामान अनुकूल तंत्रज्ञान लक्ष्यगट चर्चा**<br><br>**उपस्थिती-** शेतकरी, ग्राम कृषि समिती सदस्य, वनपाल, कृषिताई समन्वयक , स्वयंसेवक, ग्राम विकास समिती सदस्य |
| दुसरा | **२.१.१ श्रमदान**<br>**उपस्थिती:** स्वयंसेवक, कृषिताई, ग्राम कृषि विकास समिती सदस्य, संसाधन गट, शेतकरी<br>**२.१.२. शाळेतील मुलांबरोबर उपक्रम**<br>निबंध/ भाषण : माझ्या स्वप्नातील गाव<br>**उपस्थिती-** मुख्याध्यापक, अध्यक्ष व शाळा व्यवस्थापन समिती, शेतकरी<br>**२.१.३ शिवार फेरी** - अस्तिवातील मृद व जलसंधारण कामांचे नकाषांवर चिन्हांकन, **माती नमूना घेणे** ,<br>**२.१.४ विहीर पाहणी**<br>**उपस्थिती-** शेतकरी, ग्राम कृषि समिती सदस्य, स्वयंसेवक, कृषिताई | **२.२.१ पाण्याचे अंदाजपत्रक व पीक निहाय आराखडा**<br>**उपस्थिती-** शेतकरी, जलदूत, ग्रामसेवक, कृषि ताई आणि ग्राम कृषि विकास समिती सदस्य | **२.३.१ मूल्य साखळी - शेती व शेती आधारित व्यवसाय यावर लक्ष्यगट चर्चा**<br><br>**उपस्थिती** - महिला बचत गट ग्रामसेवक, तलाठी, जलदूत, कृषि सहायक, कृषि ताई आणि प्रगतिशील शेतकरी, महिला बचत गट |
| तिसरा | **३.१.१ शिवार फेरी - अस्तिवातील मृद व जलसंधारण कामांचे नकाषांवर चिन्हांकन, माती नमूना घेणे, विहीर पाहणी**<br>**उपस्थिती** - पोलीस पाटील, शेतकरी, ग्राम कृषि समिती सदस्य, वनपाल, कृषि मित्र, रोजगार सेवक | **३.२.१ गाव हवामान अनुकूलन आराखडयाचा मसुदा तयार करणे**<br><br>**उपस्थिती-** ग्राम कृषि विकास समिती सदस्य, कृषि सहाय्यक व स्वयंसेवक | **३.३.१ महिला सभा** - पाण्याच्या अंदाजपत्रकाचे व गाव हवामान अनुकूलन आराखड्याच्या मसुद्याचे वाचन |

| दिवस | सकाळचे सत्र | दुपारचे सत्र | सायंकाळचे सत्र |
|---|---|---|---|
| | **३.१.२ संसाधन नकाशा**<br>**उपस्थिती** - शेतकरी, ग्राम कृषि समिती सदस्य, वनपाल | | **उपस्थिती-** ग्रामसेवक, आशा सेविका, अंगणवाडी सेविका, कृषिताई, कृषिसखी, स्वयं सहायता गट सदस्य, ग्राम कृषि विकास समिती सदस्य |
| **चौथा** | **४.१.१ मूल्य साखळी** - पशुधन<br>**उपस्थिती-** पशुधन सेवक, पशुवैधकीय अधिकारी / वैद्य, स्वयंसेवक<br>**४.१.२ ग्राम कृषि विकास समिती बरोबर गाव हवामान अनुकूलन आराखडयाची चर्चा करणे व सुधारित मसुदा तयार करणे**<br>**उपस्थिती-** ग्राम कृषि विकास समिती सदस्य, कृषि सहाय्यक व स्वयंसेवक | **४.२.१ ग्राम सभा व प्रकल्प कृति आराखड्यास मंजुरी**<br>**उपस्थिती-** ग्राम सेवक, तलाठी, कृषि सहायक, सरपंच, कृषि पर्यवेक्षक, मंडळ कृषि अधिकारी, ग्राम कृषि विकास समिती सदस्य, व स्वयंसेवक | |

**ब. प्रत्यक्ष सूक्ष्मनियोजन प्रक्रियेदरम्यान करावयाची कार्यवाही**

१. **पथदर्शी सूक्ष्म नियोजन** : प्रत्येक उपविभागामध्ये प्रथम एक प्रकल्प गाव निवडून तेथे सूक्ष्म नियोजन समन्वयकांच्या मार्गदर्शनाखाली **प्रत्यक्ष सूक्ष्मनियोजन प्रक्रिया** राबविण्यात यावी, आणि तेथे संबधित उपविभाग/ तालुक्यातील इतर कृषी सहाय्यक, कृषी पर्यवेक्षक आणि मंडळ कृषी अधिकारी सदर प्रक्रियेचे निरीक्षण आणि सहभागीय तंत्रांचा सराव करण्याच्या उद्देशाने उपस्थित राहतील याची दक्षता घ्यावी. सदर पथदर्शी सूक्ष्म नियोजनाची पहिली व दुसरी फेरी दोन वेगवेगळ्या गावात पूर्ण करावी. **शक्यतो दि. १७ मार्च २०२५ पासून पहिली पथदर्शी सूक्ष्म नियोजन फेरी सुरु करण्यात यावी.**

२. पथदर्शी सूक्ष्म नियोजानानंतर उर्वरित सर्व गावांमध्ये लोकसहभागीय पद्धतीने सुक्ष्मनियोजनाची प्रक्रिया वेळापत्रकानुसार राबविण्यात यावी. यामध्ये गावाच्या शेती, हवामान बदल व नैसर्गिक संसाधने, पशुधन, शेती संलग्न व्यवसाय, शेतीमाल व्यवस्थापन व पणन, वनक्षेत्र या बाबींची पाहणी माहितीची पडताळणी करण्यात यावी.

३. हवामान अनुकूल तंत्रज्ञानासाठी शेतक-यांच्या गरजांवर आधारीत प्रकल्प घटकांचे नियोजन करण्यासाठी **लोकसहभागी सूक्ष्मनियोजन तंत्रे व उपक्रम अवलंबण्याची जबाबदारी कृषि सहाय्यक यांचेवर आहे.**

४. **कृषि सहाय्यकांनी सूक्ष्मनियोजन काळात गावात मुक्कामी राहाणे आवश्यक आहे.**

५. सूक्ष्मनियोजन प्रक्रियेमध्ये अवलंब करावयाची तंत्रे व आयोजित करावयाचे उपक्रम पुढीलप्रमाणे राहातील.

५.१. **ग्राम कृषि विकास समितीची आणि स्वयंसेवकांच्या भेटी (०.२.१)** - प्रत्यक्ष सूक्ष्मनियोजन प्रक्रिया सूरू होण्यापूर्वी गावातील प्रत्येक वॉर्डास भेट द्यावी.

५.२. **मशाल फेरी (०.३.१) व प्रभात फेरी (१.१.१)** - गावात सुरू होणा-या सूक्ष्मनियोजन प्रक्रियेविषयी गावाच्या सर्व भागामध्ये मशाल फेरीचे व प्रभात फेरीचे आयोजन करावे. दोन्ही फेऱ्यादरम्यान हवामान बदल, जलसंधारण, जमिनीचे आरोग्य, पाण्याचे महत्व, गटांचे महत्व इत्यादी आशयाच्या घोषणा, बॅनर, इ.साधनांचा वापर करावा. गावातील सर्व वाड्या-पाड्यांवर प्रकल्पाची माहिती होईल असे पाहावे.

५.३. **गाव बैठक (०.३.२)** - गावात सुरू होणा-या सूक्ष्मनियोजन प्रक्रियेसंबंधी ग्रामस्थांना माहिती देण्यासाठी ग्राम कृषि विकास समिती सदस्य, स्वयंसेवक, कृषि ताई, ग्रामपंचायत सरपंच व सदस्य, गाव स्तरावरील विविध शासकीय कर्मचारी अनौपचारीक गाव बैठकीचे आयोजन करावे.

५.४. **गाव नकाशा (१.१.२)**- संसाधन चमू व ग्रामस्थांच्या उपस्थितीत गाव नकाशा पटांगणावर आखावा व उपलब्ध सामाजिक व आर्थिक माहितीची पडताळणी करून माहिती भरावी.

५.५. **लक्ष्यगट चर्चा (१.२.३) - परिस्थिती विश्लेषण** – नैसर्गिक संसाधने व वन उपज, शेती व शेती आधारित व्यवसाय, पशुधन यावर झालेला हवामान बदलाचा परिणाम जाणून घ्यावा. हवामान विषयक बाबी, शेतीविषयक बाबी, पाण्याचा ताळेबंद आणि मृद जलसंधारण कामे, शेतीमाल मुल्यसाखळी, पर्यावरणीय व सामाजिक आराखडा, सामाजिक अंकेक्षण, आपत्कालीन पिक नियोजन, याविषयी लक्ष्यगट चर्चा करावी. लक्ष्यगटचर्चेच्या विषयानुसार गावातील प्रगतशील शेतकरी, महिला शेतकरी, शेतकरी, शेतकरी गट/ बचत गट, पशुपालक, इ. यांना आमंत्रित करावे.

५.६. **शालेय विद्यांर्थ्यांकरिता सांघिक उपक्रम (२.१.२)**- हवामान बदल, त्याचे शेतीवर विद्यार्थ्यांना दिसलेले परिणाम व त्यावर करावयाच्या उपाययोजना याविषयी पथनाट्य, निबंधस्पर्धा, चित्रकला स्पर्धा यासारखा उपक्रम गावातील शाळेत राबविण्यात यावा.

५.७. **श्रमदान (२.१.१)**- प्रकल्पाच्या नियोजन व अंमलबजावणीमध्ये लोकांचा सहभाग मिळावा यासाठी श्रमदानाचा उपक्रम राबविण्यात यावा.

**५.८. शिवार फेरी (२.१.३, ३.१.१)** - गावाचे दोन-तीन भाग पाडून त्या त्या भागातून शिवार फ़ेरी काढण्यात यावी. संसाधन गटाबरोबरच त्या भागातील शेतक-यांची उपस्थिती आवश्यक आहे. **अस्तित्वातील व प्रस्तावित मृद व जलसंधारण कामे ही प्रत्यक्ष जागेवर जाऊन पहावीत. सदर कामांचे Water Budget App मधील नकाशांवर चिन्हांकन करावे. सदर उपक्रम राबविताना कृषी पर्यवेक्षक / मंडळ कृषी अधिकारी यांची उपस्थिती महत्वाची राहील.**

**५.९. विहीर निरिक्षण (२.१.४, ३.१.१)** - शिवारफ़ेरीचे दरम्यान किमान दोन विहिरींची माहिती (पाण्याची खोली, उपलब्धता, पाणी उपसा, इ.) घेण्यात यावी.

**५.१०. माती नमूना घेणे (२.१.३, ३.१.१)** )- प्रत्येक शिवार फेरीदरम्यान मातीचे किमान दोन नमुने आणि अशा प्रकार एकूण चार नमुने घेण्यात यावेत व तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात यावेत. माती नमूना घेणेची पद्धती **परिशिष्ट-३** नुसार अवलंबण्यात यावी.

**५.११. संसाधन नकाशा (३.१.२)** - गाव शिवाराचा नकाशावर पिके, शेती आधारीत उद्योग, शेततळे व अन्य पाणी साठवणूक संरचना दर्शविलेला नकाशा गावात दर्शनी भागात काढण्यात यावा.

**५.१२. पाण्याचे अंदाजपत्रक (२.२.१)** - Water Budget App मध्ये भरलेल्या पावसामुळे निर्माण झालेला अपधाव, अस्तित्वातील पिकरचना आणि मृद व जलसंधारण कामे ह्या माहितीच्या आधारे तयार होणारा पाण्याचा ताळेबंद शेतक-यांना समजावून सांगावा. तसेच प्रस्तावित पिकरचना आणि मृद व जलसंधारण कामे Water Budget App मध्ये भरून पाण्याचा ताळेबंद काढण्यात यावा. पिक नियोजनासाठी याचा वापर करावा.

**५.१३. हंगामनिहाय पिकांचा आराखडा (२.२.१)** - Water Budget App मधील पाण्याच्या ताळेबंदाच्या आधारे पिकरचना प्रस्तावित करण्यात यावी.

**५.१४. मूल्य साखळी** (३.२.१. ४.१.१)- शेती व शेती आधारित व्यवसाय, पशूधन याची मुल्यसाखळी याची माहिती घेण्यात यावी.

**५.१५. मृद व जलसंधारण कामांचा आराखडा (२.२.१)** - Water Budget App मधील पाण्याच्या ताळेबंदाच्या आधारे मृद व जलसंधारण कामे प्रस्तावित करण्यात यावीत.

**५.१६. हवामान अनुकूल शेती तंत्रज्ञान आराखडा (१.३.१)** - लक्ष्यगट चर्चेदरम्यान शेतक-यांशी चर्चा करून हवामान अनुकूल शेती तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यास उत्सुक शेतक-यांची संख्या व क्षेत्र विषयक माहिती घ्यावी.

**५.१७.वैयक्तिक शेतीमधील अनुदानित बाबींचा आरखडा** : गावातील शेतकऱ्यांना प्रकल्पाच्या सहाय्याने त्यांचे शेतीमध्ये घेण्यात येवू शकणाऱ्या बाबींची माहिती दिल्यानंतर सदर बाबींची गावामध्ये किती क्षेत्रावर किंवा किती संख्येने मागणी येईल याचा अंदाज घेऊन सदर बाबींचा आराखडा तयार करण्यात यावा.

**५.१८.कृषी व्यवसाय आराखडा :** गावातील शेतीच्या उत्पादनावर आधारित, तसेच शेतीसाठी आवश्यक जैविक व सेंद्रिय निविष्ठांचा विचार करून महिला बचत गट आणि शेतकरी उत्पादक कंपन्या यांचेमार्फत कोणकोणते संभाव्य कृषी व्यवसाय उभारता येतील याचा आरखडा तयार करावा.

**५.१९.गावस्तरीय हवामान अनुकूलन आराखडा (३.२.२)-** लोकसहभागीय सूक्ष्मनियोजन तंत्र व उपक्रम अवलंब करून मिळालेल्या माहितीच्या आधारे गावात शेतक-यांना वैयक्तिक लाभाच्या बाबी, शेतकरी गट/ बचत गट यांना उपयुक्त कृषि व्यवसाय, मृद व जलसंधारण कामे याला असलेला वाव तसेच हवामान अनुकूल शेती तंत्रज्ञानाचा समावेश असलेला समग्र आराखडा व पर्यावरणीय सूचीचा मसूदा महिला सभा, ग्राम कृषि विकास समिती व ग्राम सभा यापुढे वाचन करण्यासाठी तयार करावा.

**५.२०.महिला सभा (३.३.१)** - गावस्तरीय हवामान अनुकूलन आराखड्याच्या मसुद्याचे वाचन करून महिलांच्या सूचनांचा समावेश आराखड्यात करावा.

**५.२१.ग्राम कृषि विकास समितीची बैठक (४.१.२)-** या बैठकीमध्ये गाव हवामान अनुकूलन आराखडयाविषयी चर्चा करावी व सुधारित मसुदा तयार करावा.

**५.२२.ग्रामसभा (४.२.१)-** महिला सभा, ग्राम कृषि विकास समिती यांनी सुचविलेले बदल वा सुचनांचा समावेश करून प्रस्तावित केलेल्या आराखड्यास ग्रामसभेत मंजूरी घेण्यात यावी.

६. प्रत्येक पेसा गावात स्वतंत्र सूक्ष्मनियोजन प्रक्रिया राबविण्यात यावी. पेसा ग्रामसभेच्या सूचना विचारात घेवूनच सदर गावांचा हवामान अनुकूलन आराखडा तयार करण्यात यावा.

**७. श्रमदान**:

गावातील लोकांचा सक्रिय सहभाग वाढविण्यासाठी श्रमदान ह्या तंत्राचा वापर करावयाचा आहे. यात गावामध्ये एखादे शिवारात सलग समतल चर, लूझ बोल्डर, विहीर पूनर्भरण साठी चर तयार करणे इ. उपक्रम राबविण्यात यावेत. यामुळे सर्व स्तरातील ग्रामस्थांचा सक्रीय सहभाग वृद्धिंगत होण्यास मदत होईल. याच पद्धतीने गावातील सर्वांनी एकत्र येऊन हवामानातील बदलांमुळे होणा-या परिणामांना सामोरे गेल्यास त्यामुळे होणाऱ्या परिणामांचा

प्रभाव कमी करणे शक्य होईल याची जाणीव ग्रामस्थांना होईल. कृषी सहाय्यक यांनी श्रमदानासाठी घ्यावयाच्या कामाचे स्वरूप सूक्ष्मनियोजन करण्यापूर्वी ठरवावे. याकरिता लागणारे साहित्य उदा. चुना, दोरी, टेप, दगड, सिमेंटच्या रिकाम्या गोणी, कागद इ. साहित्य स्थानिक पातळीवर उपलब्ध करून घ्यावे.

८. **सूक्ष्म नियोजन ॲपमध्ये भरावयाची माहिती:**

प्रत्येक सत्रामध्ये केलेल्या कार्यवाहीची माहिती आणि त्यावेळी संकलित केलेली माहिती MLP App मध्ये भरावी. गावातील मृद व जलसंधारण कामे याविषयीची माहिती सदर App मध्ये नकाशास्वरुपात उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. त्याचे अवलोकन करून सद्यस्थितीत त्यापैकी अस्तित्वात नसलेली कामे वगळावीत. शिवार फ़ेरीच्यावेळी प्रस्तावित करावयाची मृद व जलसंधारणाची कामे नकाशावर नोंदवावीत.

लक्षगट चर्चा, शिवार फ़ेरी च्या दरम्यान MLP App व Water Budget App मध्ये भरावयाच्या माहिती व्यतिरिक्त लोकसहभागीय सूक्ष्मनियोजन तंत्राद्वारे प्राप्त माहिती टिपून घ्यावी व ती MLP App मध्ये upload करावी.

**क : ग्रामसभेने मंजूर केलेल्या आराखड्यावरील कार्यवाही**

१. ग्रामसभेने मंजूर केलेला कृति आराखडे **(१) मृद व जलसंधारण कामे, (२) हवामान अनुकूल कृषि तंत्रज्ञान अवलंब (३) वैयक्तिक शेतकऱ्यांच्या शेतावरील बाबी (४) शेतकरी गट/ कंपन्या मार्फत प्रस्तावित कृषि पूरक व्यवसाय (५) पर्यावरणीय सूची** या सर्व कृतीआराखाड्यांसह ग्राम कृषी विकास समितीच्या ठरावासह कृषि सहाय्यक यांनी स्वाक्षरीत करून तालुका कृषि अधिकारी यांचेकडे सादर करावेत. याकरिता ठरावाचा नमूना परिशिष्ट - ४ नुसार आहे.

२. तालुका कृषि अधिकारी यांनी सदर आराखड्यामध्ये प्रस्तावित बाबींची खात्री करून घ्यावी. त्यासाठी ताकृअ, संबधित मंडळ कृषी अधिकारी आणि कृषी पर्यवेक्षक यांनी कृषी विभागाच्या प्रचलित मार्गदर्शक सूचनांनुसार प्रस्तावित मृद व जलसंधारण जागांची पडताळणी करावी. प्रस्तावित केलेल्या जागेची स्थळ पाहणी करून जागा अंतिम करावी व योग्य अथवा अयोग्य असल्यास तसे प्रमाणित करावे. तसेच आवश्यकतेनुसार मृद व जलसंधारण कामांत / जागेत तांत्रिक बदल करून कृति आराखडा उपविभागीय कृषि अधिकारी कार्यालयास सादर करावा .

३. उपविभागीय कृषि अधिकारी यांनी गावस्तरीय अनुकूलन आराखड्यातील प्रस्तावित मृद व जलसंधारण कामांची तांत्रिक पडताळणी कृषि विभागाच्या प्रचलित मार्गदर्शक सूचनांनुसार करावी.

४. उपविभागीय कृषि अधिकारी यांनी प्रस्तावित सर्व उपचारांचे जागा योग्य असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करून पोर्टल वर अपलोड करण्यात यावेत व त्या आधारे आवश्यकतेनुसार आराखडयामध्ये ऑनलाइन योग्य ते बदल करावेत.

५. उपविभागीय कृषि अधिकारी यांनी तांत्रिक पडताळणीअंती आवश्यक बदल NRM Portal वर करण्यात यावेत. सदर कार्यवाही ग्रामसभेने आराखडा मंजूर केल्यापासून १५ दिवसांमध्ये पूर्ण करावी.

६. सूक्ष्म नियोजनाचे कालावधीत संकलित केलेल्या माहितीच्या आधारे गावस्तरावरील हवामान अनुकूल आराखड्याच्या प्रपत्रांमध्ये कृषी सहाय्यकांनी संकलित केलेल्या माहितीचे मंडळ कृषी अधिकारी यांनी थोडक्यात विश्लेषण तयार करून गावनिहाय आराखडा तालुका कृषी अधिकारी यांचेकडे सादर करावा.

७. तालुका कृषी अधिकारी यांनी आराखड्याची पडताळणी संबधित मंडळ कृषी अधिकारी आणि कृषी पर्यवेक्षक यांना सोबत घेऊन पूर्ण करावी आणि तद्नंतर सदर आरखडा उपविभागीय कृषी अधिकारी यांचेकडे सादर करावा.

८. उपविभागीय कृषी अधिकारी यांनी तांत्रिक पडताळणीअंती अंतिम केलेल्या गावस्तरीय हवामान अनुकूल आराखड्यास **तांत्रिक मान्यता प्रदान करावी**. तांत्रिक मान्यता दिलेल्या गावनिहाय आराखड्यांचे उपविभागीय कृषी अधिकारी यांनी प्रकल्प संचालक (आत्मा) आणि जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांचे संयुक्त बैठकीत सादरीकरण करावे.

९. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांनी गावनिहाय आराखड्याचा तालुकानिहाय सारांश तयार करून जिल्हा समन्वय समितीसाठी सादरीकरण तयार ठेवावे.

**ड. जिल्हास्तरीय समन्वय समितीची मंजूरी**

१. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या जिल्हा समन्वय समितीसमोर “गावस्तरीय हवामान अनुकूलन आराखड्यांचे” सारीकरण करावे. यामध्ये जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सारांशाने आणि संबधित उपविभागीय कृषि अधिकारी यांनी त्यांचे क्षेत्रातील प्रकल्पाचे घटक आणि बाबींचा आराखडा तपशील सादरीकरण करावे. सादरीकरणामध्ये हवामान बदलास तोंड देण्यासाठी प्रस्तावित केलेल्या विविध वैयक्तिक तसेच सामुहिक उपायांची माहिती व त्यामुळे होणारे अपेक्षित बदल याबाबत सारांश समाविष्ट असावा.

२. गावनिहाय आराखड्यांना जिल्हास्तरीय समन्वय समितीची मान्यता घेण्यात यावी. **समन्वय समितीची मान्यता हीच संबधित आराखड्यांमध्ये समाविष्ट मृद व जलसंधारण कामाकरिता प्रशासकीय मंजूरी राहील.**

३. उपविभागीय कृषि अधिकारी यांनी मंजूर केलेले आराखडे व जिल्हास्तरीय समन्वय समितीच्या बैठकीचे इतिवृत्त याची scanned copy MLP Dashboard वर upload करावी. सदर इतिवृत्तामध्ये **संबधित आराखड्यांमध्ये समाविष्ट मृद व जलसंधारण कामाकरिता प्रशासकीय मंजूरी राहील** असे नमूद करावे.

४. ग्रामसभेने प्रस्तावित केलेला गावस्तरीय हवामान अनुकूलन आराखडा व प्रशासकीय मंजूरी प्राप्त आराखडा यात तफावत असल्यास तसा बदल कृषि सहाय्यकामार्फ़त MLP App मध्ये करून घेण्यात यावा.

५. मंजूर आराखड्याच्या २ छायाप्रती (hard copy) काढाव्यात, Spiral Binding करून ग्राम कृषी विकास समितीकडे आणि कृषी सहाय्यक यांचेकडे देण्यात यावा.

६. अंमलबजावणी सुरु असताना जर मृद व जलसंधारण कामामध्ये काही संख्यात्मक किंवा क्षेत्रात्मक बदल करण्याची आवश्यकता भासल्यास त्यासाठी अगोदर असा बदल करण्यापूर्वीच्या हंगामातील पाऊस गृहीत धरून गावाचा पाण्याचा ताळेबंद तयार करावा, आणि अपधाव शिल्लक असल्याचे आढळल्यास नव्याने कामे सुचवून आराखडा सुधारित करून घ्यावा. सुधारित आराखड्यास ग्राम कृषी समितीची मान्यता घेवून उपविभागीय कृषी अधिकारी यांनी तांत्रिक मान्यता प्रदान करावी आणि वर उल्लेखल्याप्रमाणे सुधारित आराखड्यास कारणासह सादरीकरण करून समन्वय समितीची मान्यता घेण्यात यावी. तद्नंतर सुधारित आरखडा प्रकल्पाचे पोर्टलवर उपलोड करावा.

७. **कोणत्याही परिस्थितीमध्ये प्रकल्पाच्या पोर्टलवरील कार्यवाहीला अपवादात्मक रित्या देखील डावलून ऑफलाईन रीतीने एखादी प्रक्रिया किंवा टप्पा पूर्ण केल्याचे आढळल्यास सदर कामाच्या दायीत्वाची जबाबदारी संबधित अधिकारी/ कर्मचारी यांचेवर निश्चित केली जाईल आणि त्यांचेवर प्रशासकीय कारवाई केली जाईल याची गांभीर्याने दाखल घेण्यात यावी.**

## <u>४ : सुक्ष्मनियोजनाकरिता माहिती, नकाशे व साहित्य</u>

### अ. लोकसहभागीय सूक्ष्मनियोजन प्रक्रियेकरिता आवश्यक माहिती व नकाशे

१. संबंधित गावाची २०११ च्या जनगणनेची लोकसंख्या विषयक माहिती

२. संबंधित गावाची पशुगणना २०२० नुसार माहिती

३. प्रकल्प व्यवस्थापन कक्षाने (PMU) तयार केलेले संबंधित गावांचे पुढील नकाशे.

अ. गावाची सर्वसाधरण माहिती चा नकाशा (सर्वे क्रमांक सहित) – Village Base Map (With Survey Numbers)

ब. पाणलोट क्षेत्र उपचार नकाशा – Watershed Treatment Map

क. जमिनीचा वापर नकाशा – Land Use Map

४. सूक्ष्मनियोजन मोबाईल ॲप ( MLP App)

५. पाण्याचा ताळेबंद मोबाईल ॲप (Water Budget App)

६. गावस्तरीय हवामान अनुकूलन आराखडा प्रपत्रे

वरील सर्व माहिती व नकाशे प्रकल्प व्यवस्थापन कक्षाकडून उपलब्ध करून देण्यात येत असून सूक्ष्मनियोजन ॲपच्या वापराबाबतचे प्रशिक्षण पुस्तिका देण्यात येत आहे.

**आ. आवश्यक स्टेशनरी/ साहित्य**

सूक्ष्म नियोजन प्रक्रियेसाठी अनेक तंत्रांचा अवलंब करावा लागणार आहे. त्यासाठी स्टेशनरी व इतर किरकोळ साहित्याची आवश्यकता असते. सदर साहित्यामध्ये बॉक्स फाइल, चार्ट पेपर, स्केच पेन, ए४ पेपर, रजिस्टर, पेन- पेन्सिल, शार्पनर, खोड रबर, सेलो टेप, मातीच्या नमुन्यासाठी पिशवी, चुना फक्की, इ. गोष्टींचा समावेश असून या सर्व वस्तू प्रत्येक गावामध्ये प्रक्रिया सुरु करण्यापूर्वी संबधित कृषि सहाय्यकाच्या ताब्यात देण्यात याव्यात. तसेच सूक्ष्मनियोजन प्रक्रिया मार्गदर्शक सुचना, सुक्ष्मनियोजना दरम्यान भरावयाची विविध प्रपत्रे, सूक्ष्मनियोजन मोबाईल ॲप हाताळणी पुस्तिका, गावस्तरीय हवामान अनुकूलन आराखडा प्रपत्र, ग्राम कृषि विकास समिती बॅनर, पाण्याचा ताळेबंद फ्लेक्स बोर्ड यासारखे प्रक्रिया अंमलबजावणी विषयक साहित्य देण्यात यावे. उपविभागीय कृषि अधिकारी यांनी सदर वस्तूंची खरेदी प्रकल्पाच्या प्रापण मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करून वेळेत करावी. खरेदी केल्यानंतर पुरवठादारांची देयके तात्काळ अदा करण्यात यावी.

## ५. सूक्ष्मनियोजन प्रक्रियेकरिता मनुष्यबळ व जबाबदा-या

गाव स्तरावर राबविण्यात येणा-या लोकसहभागीय सूक्ष्मनियोजन प्रक्रियेसाठी तसेच क्षमता बांधणी, सनियंत्रण व समन्वयन करणेकरिता आवश्यक मनुष्यबळ व त्यांच्या पुढीलप्रमाणे राहतील-

| अधिकारी/ कर्मचारी पदनाम | स्तरनिहाय जबाबदा-या |
|---|---|
| कृषि सहाय्यक | - स्वयंसेवकांची निवड ग्राम कृषी विकास समितीमार्फत करून घेणे.<br>- सूक्ष्मनियोजन प्रक्रियेची पूर्वतयारी, प्रशिक्षण, प्रभात फ़ेरी, गटचर्चा, शिवार फ़ेरी, पाण्याचा ताळेबंद, प्रस्तावित मृद व जलसंधारण कामांच्या जागांची पहाणी व पिकाचे नियोजन, श्रमदान कार्यक्रमाकरिता जागेची निश्चिती, कृषि व्यवसाय नियोजन करणे;<br>- महिला सभा, समिती सभा व ग्रामसभेमध्ये सक्रिय सहभाग घेऊन गाव विकास आराखड्यास मंजूर करून घेणे प्रकल्प कृति आराखड्यास मान्यता देणे |
| मंडळ कृषि अधिकारी व कृषि पर्यवेक्षक | - सूक्ष्म नियोजन प्रक्रियेचे प्रभावी समन्वयन<br>- मृद व जलसंधारण कामांच्या जागा निश्चित करणे<br>- मृद व जलसंधारण आराखडा तांत्रिक दृष्ट्या योग्य तयार करून घेणे,<br>- ग्रामस्तरीय हवामान अनुकूलन आराखड्यातील विश्लेषणात्मक भाग तयार करणे. VAP मधील तक्त्यांमध्ये तयार (generate) होणाऱ्या नकाशे व माहितीच्या आधारे प्रत्येक प्रत्येक गावाचे विश्लेषण लिखित स्वरुपात तयार करणे |
| तालुका कृषी अधिकारी | - सूक्ष्म नियोजन प्रक्रियेचे प्रभावी समन्वयन<br>- सुक्ष्मनियोजनाबाबत लोकप्रतिनिधींना अवगत करणे.<br>- मृद व जलसंधारण आराखडा तांत्रिक दृष्ट्या योग्य तयार करून घेणे<br>- सूक्ष्मनियोजन प्रक्रियेदरम्यान संबंधित गावांना भेटी देणे, प्रक्रिया गुणवत्तापूर्वक होण्यासाठी प्रभावी सनियंत्रण करणे<br>- **कृषि सहाय्यकाकडे जास्त गावे असल्यास सूक्ष्मनियोजन प्रक्रिया सलगपणे राबविण्यासाठी आपले अधिनस्त इतर कृषी सहय्यक व कृषि पर्यवेक्षक यांना गावे विभागून देणे**.<br>- मंडळ कृषि अधिकारी, कृषि पर्यवेक्षक यांनी तयार केलेल्या आराखड्याचे अवलोकन करणे. |
| उपविभागीय कृषि अधिकारी , प्रकल्प सहय्यक, सूक्ष्मनियोजन समन्वयक | - सूक्ष्मनियोजन वेळापत्रक तयार करणे<br>- सुक्ष्मनियोजनाबाबत लोकप्रतिनिधींना अवगत करणे.<br>- सुक्ष्मनियोजनासाठी क्षेत्रीय कर्मचाऱ्यांची क्षमता बांधणी करणे.<br>- सुक्ष्मनियोजनाकरिता आवश्यक साहित्य उपलब्ध करणे<br>-सूक्ष्मनियोजन प्रक्रियेदरम्यान संबंधित गावांना भेटी देणे, प्रक्रिया गुणवत्तापूर्वक होण्यासाठी प्रभावी सनियंत्रण करणे<br>- सुक्ष्मनियोजनादरम्यान कृषि विद्यापिठे/ कृषि विज्ञान केंद्रातील/ कृषि-जलसंधारण क्षेत्रातील तज्ज्ञांचा तांत्रिक सहभाग घेणे<br>- गावस्तरीय हवामान अनुकूलन आराखडा विहित नमुन्यात तयार करणे |

| अधिकारी/ कर्मचारी पदनाम | स्तरनिहाय जबाबदा-या |
|---|---|
| | -आराखड्यांची तांत्रिक पडताळणी करून मान्यता देणे<br>- गावस्तरीय हवामान अनुकूलन आराखड्यांचे जिल्हा समन्वय समितीसमोर सादरीकरण करणे<br>- MLP App Dashboard वर आवश्यक माहिती भरणे.<br>- सुक्ष्मनियोजनाकरिता झालेल्या खर्चाची प्रतिपूर्ती करणे<br>- सूक्ष्मनियोजन समन्वयक यांच्याकडून दिलेल्या जबाबदा-यानुसार काम करून घेणे. |
| जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, प्रकल्प संचालक (आत्मा) | - **सूक्ष्म नियोजन समन्वयक यांची नेमणूक करणे**<br>- प्रकल्प गावांचे सुक्ष्मनियोजनासाठी आवश्यक नियोजन करणे, कृषि विद्यापिठे/ कृषि विज्ञान केंद्रातील तज्ञांचे तसेच इतर संलग्न विभागांशी समन्वयन करणे व सर्वसाधारण सनियंत्रण करणे<br>- सुक्ष्मनियोजनाबाबत लोकप्रतिनिधींना अवगत करणे.<br>-सुक्ष्मनियोजनासाठी जिल्ह्यातील अधिकारी/ कर्मचारी/ तज्ज्ञ यांची क्षमता बांधणी करणे.<br>- सूक्ष्मनियोजन प्रक्रियेदरम्यान संबंधित गावांना भेटी देणे, प्रक्रिया गुणवत्तापूर्वक होण्यासाठी प्रभावी सनियंत्रण करणे<br>- गावस्तरीय हवामान अनुकूलन आराखड्यांना जिल्हा समन्वय समितीच्या बैठकीमध्ये मंजूरी घेणे<br>- सुक्ष्मनियोजनाकरिता प्राप्त निधीचे उपविभागनिहाय वितरण करणे. |

## <u>६. क्षमता बांधणी</u>

### १. उपविभाग/ तालुका स्तरीय अधिका-यांची कार्यशाळा

सदर सूक्ष्मनियोजन प्रक्रियेमध्ये सहभागी असणारे उपविभागीय कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी, मंडळ कृषि अधिकारी, कृषि पर्यवेक्षक यांना सूक्ष्मनियोजन प्रक्रियेची अंमलबजावणी करण्याच्या मार्गदर्शक सुचना, सुक्ष्मनियोजनाची विविध तंत्रे, सूक्ष्मनियोजन आराखडा तयार करणे व प्रक्रियेचे सनियंत्रण करणे याविषयीची सखोल माहिती होण्याच्या उद्देशाने प्रकल्प व्यवस्थापन कक्षामार्फ़त त्यांचे प्रशिक्षण घेण्यात येईल.

**२. कृषी सहाय्यकांचे सूक्ष्मनियोजनविषयक प्रशिक्षण**

सुक्ष्मनियोजन करण्याची जबाबदरी कृषी सहाय्यकांची असल्याने त्यांना सूक्ष्मनियोजन करण्याबाबत प्रादेशिक विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्थेमध्ये प्रशिक्षण देण्यात येणार आहे. सदर प्रशिक्षण यशदा या राज्यस्तरीय प्रशिक्षण संस्थेमार्फत प्रशिक्षित प्रशिक्षकांमार्फात देण्यात येणार आहे.

**३. सरपंचांचे प्रशिक्षण**

प्रकल्प गावांचे ग्रामपंचायतीच्या सरपंचांना प्रकल्प परिचय करून देण्यासाठी यशदामार्फत प्रशिक्षण देण्यात येणार आहे. त्याबरोबरच सूक्ष्म नियोजन करण्याबाबत त्यांना माहिती देण्यात येणार आहे.

**४. स्वयंसेवकांचे प्रशिक्षण -**

गावपातळीवर निवड करण्यात आलेल्या ४ स्वयंसेवकांचे प्रकल्पामार्फत वेबिनार द्वारे प्रकल्प ओळख आणि त्यांचे जबाबदाऱ्या याबद्दल मार्गदर्शन केले जाणार आहे. तालुका कृषी अधिकारी यांनी सदर स्वयंसेवकांचे मंडळ/तालुकास्तरावर **१० मार्च २०२५ पर्यंत एक दिवसीय कार्यशाळा घ्यावी**. यव्यतिरिक्त स्वयंसेवकांना लोकसहभाग विषयक विशेष प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

## ७. सूक्ष्मनियोजन प्रक्रियेकरिता आर्थिक मापदंड

| खर्चाची बाब | तपशील | मापदंड (रु) |
|---|---|---|
| मानधन | सूक्ष्मनियोजन समन्वयक मानधन | **रु ३०,०००/- प्रति माह प्रति व्यक्ती**-(कमाल चार महिने) |
| | सूक्ष्मनियोजन स्वयंसेवक मानधन | **रु** ५००/- प्रति दिन प्रति व्यक्ती ५ दिवसांकरिता |
| साहित्य | स्टेशनरी, लेखन साहित्य, रंगीत नकाशे, कार्यक्रम बॅनर, साहित्य इ. | **रु**.१०००/- प्रति गाव |
| माती नमूना | प्रति गाव चार नमूने | रु. ३००/- प्रती नमुना ( शासकीय दरामध्ये बदल झाल्यास तो लागू होईल) |
| प्रक्रिया अंमबजावणी | उपविभाग (प्रक्रिया अंमलबजावणी साहित्य, वाहन भाडे, इ.) | **रु** १०००/- प्रति गाव |
| बैठक | ग्राम कृषी विकास समिती बैठक व इतर बैठकांसाठी चहापान | र. १००० /- प्रती गाव |
| छपाई/ झेरॉक्स व स्पायरल बाईंडींग | गावस्तरीय हवामान अनुकूलन आराखडा (VAP) (२ प्रती) | रु १५० /- प्रति प्रत (मुखपृष्ठ रंगीत) |

## ८. सूक्ष्मनियोजन प्रक्रियेकरिता निधीचे नियोजन

सूक्ष्मनियोजन प्रक्रियेकरिता लागणारा निधी प्रकल्प व्यवस्थापन कक्षाकडून मागणीनुसार जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी स्तरावर उपलब्ध करून देण्यात येईल. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांनी सदर निधी उपविभागीय कृषि अधिकारी यांना सत्वर वितरीत करावा आणि खर्चाचे सनियंत्रण करावे. उपविभागीय कृषि अधिकारी यांनी सदर निधी निर्देशीत केलेनुसार या प्रकल्प उपक्रम संकेतांकाखाली खर्ची टाकावयाचा आहे. सदर घटकासाठी वितरीत निधीमधून मंजूर बाबीवर झालेला खर्च मंजूर मापदंडाच्या अधिन राहून तात्काळ संबंधित समन्वयक/ स्वयंसेवक/ वस्तू- सेवा पुरवठादार यांना अदा करावयाचा आहे. मानधन अदायगीस विलंब झाल्यास सूक्ष्मनियोजन प्रक्रियेच्या दर्जात्मक अंमलबजावणीवर प्रतिकूल परिणाम होऊ शकतो, ही बाब लक्षात घेऊन मानधन अदायगीस विलंब होणार नाही याची दक्षता घ्यावी. सूक्ष्मनियोजानासाठीच्या खर्चास विलंब झाल्यास तसेच प्रकल्पाचे वित्तीय आणि प्रापण विषयक सूचनांचे उल्लंघन केल्यास संबधित लेखा सहाय्यक/ प्रापण सहाय्यक/ प्रकल्प सहाय्यक/ लेखाधिकारी/ उपविभागीय कृषि अधिकारी प्रशासकीय कारवाईस पात्र राहातील. अंतर्गत लेखापरीक्षण यंत्रणेमार्फत वेळोवेळी सदर प्रक्रियेसाठी करण्यात येणाऱ्या खर्चाचे लेखापरीक्षण करण्यात येणार आहे. याशिवाय नियंत्रक व महापरीक्षक लेखा यंत्रणेकडून देखील सदर खर्चाचे तपशीलवार लेखापरीक्षण करण्यात येणार आहे.

## ९ : सनियंत्रण व मूल्यमापन

सूक्ष्मनियोजन प्रक्रियेचे सनियंत्रण करणे, प्रगतीचा आढावा घेणे, विविध स्तरावर मार्गदर्शन करणे, समस्यांचे निराकरण करणे, सूक्ष्मनियोजन प्रक्रियेचा दर्जा उंचावणे, निधीचा योग्य विनियोग करणे, मनुष्यबळाची व्यवस्था पहाणे व कालमर्यादेत उपक्रम यशस्वी करणे यासाठी विविध स्तरावरील अधिका-यांना जबाबदा-या सोपविण्यात आलेल्या आहेत.

| **अधिकारी** | सूक्ष्मनियोजन **क्षेत्रीय तपासणी** |
|---|---|
| विभागीय कृषी सह संचालक | १ गाव प्रती जिल्हा |
| जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी | १ गाव प्रति तालुका |
| उपविभागीय कृषि अधिकारी | १ गाव प्रति गावसमूह (क्लस्टर) |
| तालुका कृषि अधिकारी | २ गावे प्रति गावसमूह (क्लस्टर) |

| | |
|---|---|
| जिल्हा स्तरावरील नोडल अधिकारी (प्रकल्प विशेषज्ज्ञ- कृषि व्यवसाय/ प्रापण/ मनुष्यबळ विकास) | २ गावे प्रति गावसमूह (क्लस्टर) प्रत्येक विशेषज्ञाने भेट द्यावी |
| प्रकल्प सहाय्यक (उपविभागीय कृषि अधिकारी कार्यालय) | २ गावे प्रति गावसमूह (क्लस्टर) |

याशिवाय बाह्ययंत्रणेकडून सानियंत्रण व मूल्यमापन करण्यात येणार आहे. सदर संस्थेकडून समवर्ती, मध्यवर्ती व अंतिम मुल्यमापनाचे दरम्यान शेतकरी, ग्राम कृषि संजीवनी समिती, प्रकल्प अंमलबजावणी करणारे अधिकारी व कर्मचारी यांचेकडून प्रश्नावलीच्या सहाय्याने सुक्ष्मनियोजनाबाबत अभिप्राय घेणेत येणार आहे.

**१०: जनजागृती**

प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणारी सूक्ष्म नियोजन प्रक्रिया संपूर्णतः लोकांचा सहभाग निश्चित करून पार पाडावयाची असल्याने सदर प्रक्रिया राबविण्यात येणाऱ्या गावसमुहात व्यापकपणे जनजागृती करण्यात यावी यासाठी प्रामुख्याने प्रत्येक गावात दवंडी देणे, प्रकल्पाबाबतची घोषवाक्ये सार्वजनिक ठिकाणी लिहिणे, संबधित गावाचे सरपंचाना उद्देशून पत्राद्वारे आवाहन करणे, स्थानिक वृत्तपत्रामध्ये बातमी देणे, स्थानिक चॅनल वरून प्रसिद्धी देणे इ. माध्यमे वापरण्यात यावीत. याकरिता प्रचार प्रसिद्धी उपक्रम सांकेतांकाखाली उपलब्ध निधीतून खर्च करण्यात यावा.

Paimalf 25/2/25

**प्रकल्प संचालक**
**नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा**

## परिशिष्ट - १

### सूक्ष्मनियोजन समन्वयक : निवडीचे निकष, जबाबदाऱ्या व मानधन

**सूक्ष्मनियोजन समन्वयक निवडीचे निकष**

१. कृषी / समाजशास्त्र/ समाजकार्य/ग्रामविकास/ संवादशास्त्र वा तत्सम विषयातील पदवी धारण केलेली व्यक्ती
२. या पूर्वी शासकीय योजनेअंतर्गत सूक्ष्मनियोजन, गाव विकास आराखडा, लोकसहभागीय तंत्रांचा अवलंब, पाणलोट व्यवस्थापन आराखडा तयार करणे इ. कामांचा अनुभव आवश्यक.
३. लोकसहभागीय सूक्ष्मनियोजन बाबत प्रशिक्षित प्रवीण प्रशिक्षकांना प्राधान्य.
४. संगणकाचे ज्ञान, माहिती संकलन, विश्लेषण व प्रलेखनाचा अनुभव असणे गरजेचे.
५. समाजकार्याचा अनुभव व आवड तसेच संवाद कौशल्य.
६. सुक्ष्मनियोजन प्रक्रिया कालावधीमध्ये पूर्ण वेळ काम करण्याची तयारी आवश्यक.

**सूक्ष्मनियोजन समन्वयक निवड प्रक्रिया**

सूक्ष्मनियोजन समन्वयक निवडीकरिता जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालयाकडून पुढील प्रक्रिया पार पाडावी.

१. जिल्हास्तरीय सूक्ष्ममनियोजन समन्वयक निवड समिती (जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, प्रकल्प संचालक (आत्मा), आणि संबंधित उपविभागीय कृषि अधिकारी) स्थापन करावी.
२. सूक्ष्मनियोजन समन्वयक निवडीचे निकष नमूद करून मुलाखतीकरिता (Walk in Interview) करिता स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात देण्यात यावी. सदर नेमणूक **चार महिने कालावधीसाठी मानधन तत्वावर** असल्याची व कोणत्याही परिस्थितीत सदर नेमणूक कायमस्वरूपी नसल्याची बाब जाहिरातीत नमूद करावी.
३. जाहिरातीनुसार प्राप्त अर्जांची गुणात्मक छाननी जिल्हास्तरीय सूक्ष्ममनियोजन समन्वयक निवड समितीने करावी.
४. शैक्षणिक आर्हता, अनुभव व मुलाखत याचे गुण एकत्रित करून सर्वाधिक गुण मिळवणा-या उमेदवारास सूक्ष्मनियोजन समन्वयक म्हणून नेमण्यात यावे.

**सूक्ष्मनियोजन समन्वयक यांच्या जबाबदा-या**

१. उपविभागातील गावसमुहाचे सूक्ष्मनियोजन वेळापत्रक तयार करणे
२. सुक्ष्मनियोजनाबाबत MLP App मध्ये भरलेल्या माहितीचे सनियंत्रण करणे.
३. गावनिहाय कृति आराखडा तयार करून घेणे व त्यांचे संकलन करणे.
४. गावनिहाय संकलित माहितीचे मंडळ कृषी अधिकारी व कृषी पर्यवेक्षक यांचे समवेत विश्लेषण करून घेणे

५. संकलित माहिती आणि विश्लेषण केल्यानंतर विहित प्रपत्रामध्ये “**गावस्तरीय हवामान अनुकूलन आराखडा” तयार करून उपविभागीय कृषी अधिकारी यांचेकडे सादर करणे**

६. सूक्ष्मनियोजन प्रक्रियेदरम्यान गावास भेट देणे.

७. सूक्ष्मनियोजन प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडण्यासाठी कृषी सहाय्यकांना मार्गदर्शन करणे.

**मानधन व प्रमाणपत्र**

गावनिहाय हवामान अनुकूलन आराखडे मार्गदर्शन सूचनांनुसार तयार करून उपविभागीय कृषि अधिकारी यांना प्रत्येक पंधरवड्यात सादर करावी. यासाठी संबंधित समन्वयकाने महिन्यामध्ये केलेल्या कामाचा अहवाल उपविभागीय कृषि अधिकारी यांना सादर करावा. सूक्ष्मनियोजन समन्वयकास सदर कामासाठी मासिक तत्त्वावर रु. ३०,०००/- प्रति माह इतके मानधन प्रवास खर्चासह दिले जाईल. कामाचा कालावधी चार महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही. उपविभागीय कृषि अधिकारी यांनी समन्वयकांना “**लोकसहभागातून सूक्ष्मनियोजन केल्याबद्दल**” आणि “**गावस्तरीय हवामान अनुकूलन आराखडा”** तयार केल्याबद्दल प्रमाणपत्र द्यावे.

## परिशिष्ट- ३

## माती परीक्षण

गावामध्ये सूक्ष्म नियोजन प्रक्रिया सुरु असताना शिवार फेरीमध्ये **गावातून किमान ४ मातीचे** नमुने गोळा करावयाचे आहेत.

**मातीचा प्रातिनिधीक नमुना घेण्याची पद्धत :-**

- प्रथम शेतीची पाहणी करून जमिनीच्या गुणधर्मांनुसार (उदा., जमिनीचा रंग, खोली, उंचसखलपणा, पाणथळपणा आणि चोपण इ.) विभाग करून प्रत्येक विभागातून एक प्रातिनिधिक नमुना परीक्षणासाठी घ्यावा.

- नमुना ज्या जमिनीवर घ्यावयाचा आहे, त्या क्षेत्रावर सर्व क्षेत्राचा समावेश होईल अशी काल्पनिक नागमोडी रेषा गृहीत धरून रेषेच्या प्रत्येक टोकावर एक याप्रमाणे अंदाजे १०-१२ ठिकाणचा नमुना घ्यावा.

- नमुना घ्यावयाचे जागेवरील काडीकचरा बाजूला करून कुदळ किंवा फावड्याच्या साहाय्याने इंग्रजी व्ही (V) आकाराचे खड्डे घ्यावेत.


- जमिनीच्या वरील पृष्ठभागापासून तळापर्यंतची माती खड्ड्यातून खुरप्याच्या/लाकडी खुंटीच्या सहाय्याने खरडून गोळा करावी.

- १०-१२ ठिकाणाची एकत्र केलेल्या मातीचे चार समान भाग करून समोरासमोरील दोन भाग काढून टाकावेत व उर्वरित दोन भाग एकत्र मिसळून एक किलो माती शिल्लक राहील अशा पद्धतीचा अवलंब करावा.

- माती गोळा करण्यासाठी खुरपे, गीरमीट, घमेले इ. वापरावे.

- धातूचे साहित्य वापरू नये.

- माती ओली असल्यास ती कापडावर सावलीत वाळवावी व नंतर स्वच्छ कापडी/पॉलिथीन पिशवीत भरून योग्य माहितीसह प्रयोगशाळेत पाठवावी.



- **मातीचा नमुना ३० सेंमी  खोलीपर्यंत घ्यावा**

- **माती परीक्षणासाठी प्रातिनिधिक नमुना घेताना घ्यावयाची काळजी**

- शेतात जनावरे बसण्याची जागा, खत व कचरा टाकण्याच्या जागा, विहिरीजवळील जागा, शेतीचा बांध, दलदलीची जागा, झाडाखालची जागा, उकिरडा इत्यादी जागेतून मातीचे नमुने घेऊ नयेत
- मातीचा नमुना साधारणपणे पिकाची काढणी झाल्यानंतर परंतु नांगरणीपूर्वी घ्यावा
- शेतात पीक असल्यास दोन ओळीतील जागेतून नमुना घ्यावा
- शेतामध्ये रासायनिक खते, शेणखत किंवा कंपोस्ट खत देण्यापूर्वी मातीचा नमुना घ्यावा.
- रासायनिक तसेच सेंद्रीय खते दिल्यानंतर साधारणपणे दोन ते अडीच महिन्यापर्यंत मातीचा नमुना घेऊ नये
- निरनिराळ्या प्रकारच्या जमिनीचे वा निरनिराळ्या शेतातील मातीचे नमुने एकत्र मिसळू नयेत
- रासायनिक खताच्या रिकाम्या पिशव्या मातीचा नमुना घेण्यासाठी वापरू नयेत

**माती परीक्षण नमुना तपासणीसाठी पाठवताना घ्यावयाची काळजी**

- मातीचा नमुना स्वच्छ, पुन्हा वापरता येण्याजोग्या प्लास्टिक पिशवीत ठेवावा.
- मातीचा नमुन्यासोबत प्रकल्पाचे नाव, शेतकऱ्याचे नाव, तालुका, गावचे नाव, गट नंबर, सर्वे नंबर, घेण्यात येत असलेली पिके इ. योग्य माहिती लिहून ती पिशवीत टाकावी.

गावातून जमा केलेले मातीचे नमुने कृषि सहाय्यकांनी कृषि विभागाच्या शासकीय प्रयोगशाळेमध्ये जमा करावेत.

## परिशिष्ट- ४
## ग्राम कृषि विकास समिती ठराव नमूना

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा-२

दिनांकः- / / रोजी झालेल्या ग्राम कृषि संजीवनी समिती सभेचे इतिवृत्त

<table>
<tr><td colspan="2">१. ग्रामपंचायतीचे नाव</td><td>२. अंतर्भूत गावे-</td></tr>
<tr><td>३. सभेची वेळ</td><td rowspan="2">४. सभेची तारीख</td><td rowspan="2">५. सभेचे स्थळ</td></tr>
<tr><td>६. सभेचा क्रमांक</td></tr>
<tr><td colspan="3">७. सभेस कोणी सन्माननीय गृहस्थ अगर अधिकारी हजर असल्यास त्याची नोंद (हुद्द्यासह)</td></tr>
<tr><td colspan="3">८. सभेचे अध्यक्ष मान्यवरः-<br>दि. / / रोजी मा. श्री. सरपंच/ यांचे अध्यक्षेतेखाली झालेल्या नियमित मासिक / खास सभेमधील उपस्थिती खालीलप्रमाणे आहे.</td></tr>
</table>

| अ क्र | समिती सदस्य/ अकार्यकारी सदस्याचे नाव | हुद्दा | गाव | स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

<table>
<tr><td colspan="4">वरीलप्रमाणे सभेस समिती सदस्य उपस्थित असल्याने व कोरम पूर्ण झाल्याने सभेचे अध्यक्ष यांनी उपस्थितांचे स्वागत करून सभेस सुरूवात करण्यात आली.</td></tr>
<tr><th>विषय नंबर</th><th>ठराव नंबर</th><th>सभेपुढे विचाराकरिता आलेले विषय व ठराव (उदाहरणादाखल)</th><th>शेरे आणि तारखेसह ठरावाची अंमलबजावणी</th></tr>
<tr><td></td><td></td><td>नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा-२ च्या कृति आराखड्यास मंजूरी देणेबाबत . . .</td><td></td></tr>
<tr><td></td><td></td><td>नानाजी देशमुख कृषि संजीवनी समिती टप्पा-२ मध्ये ---- ग्रामपंचायतीतील ------ प्रकल्प गावे अंतर्भूत आहेत. सदर गावांमध्ये दि.---- ते दि. ---- या कालावधीत सूक्ष्मनियोजन प्रक्रिया पार पडलेली आहे. प्रकल्प गावांचे कृति आराखडे (१) मृद व जलसंधारण कामे, (२) तंत्रज्ञान विस्तार आराखडा (३) वैयक्तिक बाबींचा आराखडा (४) कृषि व्यवसाय आराखडा (५) पर्यावरणीय सूची या उपआराखड्यांसह तयार करण्यात आलेले आहेत. त्यांचा गावनिहाय तपशील पुढीलप्रमाणे आहे.
<table>
<tr><th>अ क्र</th><th>गावाचे नाव</th><th>वैयक्तिक लाभाच्या घटकांची मागणी (संख्या) (हेक्टर)</th><th>शेतकरी गट/ बचत गट मागणी (संख्या) (हेक्टर)</th><th>मृद व जलसंधारण कामे मागणी (रु. कोटीमध्ये)</th></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
</table>
<br>ही सभा कृति आराखड्यास सर्वानुमते मंजूरी देत आहे.<br>ठराव सर्वानुमते मंजूर<br>सूचक -<br>अनुमोदक -</td><td></td></tr>
<tr><td></td><td></td><td>---</td><td></td></tr>
<tr><td></td><td></td><td>---</td><td></td></tr>
</table>

---------------------------समाप्त---------------------------------------------

## परिशिष्ट – ५

## गावस्तरीय हवामान अनुकूलन आराखडा (Village Adaptation Plan)

### I.पाण्याची उपलब्धता आणि कार्यक्षम वापर

१. पाण्याचा ताळेबंद: गावनिहाय पाण्याचा ताळेबंद

२. जलसंधारण कामे - क्षेत्र उपचार, ओघळीवरील उपचार, मुलस्थानी संधारण (कामाचे नाव, संख्या, क्षेत्र) व नकाशावर चिन्हांकन

३. भूजल पुनर्भरण कामे (कामाचे नाव, संख्या , क्षेत्र) व नकाशावर चिन्हांकन

४. विहीर पुनर्भरण (संख्या)

५. पाणी साठवण सुविधा (संख्या)

६. सुक्ष्मसिंचन (ठिबक आणि तुषार) आराखडा (क्षेत्र)

### II.मृदा आरोग्य आराखडा

१. मृदा आरोग्य पत्रिकांची सद्यस्थिती (शेतकरी संख्या)

२. सेंद्रीय कर्ब सद्यस्थिती (सरासरी %)

३. जैविक व सेंद्रिय खतांचे उत्पादन आराखडा (शेतकरी संख्या)

४. संवर्धित शेती पद्धती आराखडा (क्षेत्र)

### III.पिकपद्धती

१. सद्यस्थितीतील पिकपद्धती (हंगाम निहाय व पिकनिहाय क्षेत्र)

२. प्रस्तावित पीक पद्धती (हंगाम निहाय व पिकनिहाय क्षेत्र )

### IV.कर्बग्रहण आराखडा

१. वृक्षलागवड (क्षेत्र)

२. फ़ळबाग लागवड (क्षेत्र)

३. बांबू लागवड (क्षेत्र)

४. जैविक कुंपण (क्षेत्र)

### V.उत्पादन खर्च कमी करण्यासाठी उपायांचा आराखडा

१. मशागत खर्चात कपात (संवर्धित शेती पद्धतीचा अवलंब- क्षेत्र)

२. वाढत्या मजूरी खर्चात कपात (कृषि यांत्रिकीकरणास प्रोत्साहन- संख्या)

३. रासायनिक खतांवरील खर्चात कपात (जैविक व सेंद्रीय खतांचा वापर वाढविणे- क्षेत्र)

४. रासायनिक किटकनाशकांवरील खर्चात कपात (जैविक व सेंद्रीय कीडनाशकांचा वापर वाढविणे- क्षेत्र)

**VI.हवामान अनुकूल बियाण्याचे संवर्धन आणि उत्पादन आराखडा**

१. स्थानिक हवामान अनुकूल बियाण्याची माहिती (पीक,वाण)

२. स्थानिक वाणाचे संवर्धन व उत्पादन आराखडा (शेतकरी संख्या, क्षेत्र)

३. प्रमाणित/ पायाभूत बियाणे उत्पादन आराखडा (पिके, वाण, क्षेत्र)

**VII.हवामान अनुकूल तंत्रज्ञानाचा अवलंब (क्षेत्र)**

१. हवामान अनुकूल बियाण्याचा अवलंब (सध्याचे क्षेत्र आणि प्रस्तावित क्षेत्र)

२. हवामान अनुकूल तंत्रज्ञानाचा अवलंब (सध्याचे क्षेत्र आणि प्रस्तावित क्षेत्र)

**VIII.एकात्मिक किडरोग व्यवस्थापन**

१. प्रमुख पिकांवरील किडींचा- रोगांचा तपशील (पिके, किडींची नवे, रोगांची नवे)

२. जैविक किटकनाशके, नैसर्गिक किटकनाशके याचे शेतावरच उत्पादन (शेतकरी/ महिला गट संख्या)

३. रासायनिक कीडनाशकांचे फवारताना संभाव्य धोके कमी करण्यासाठी जागृती व प्रशिक्षण ( व्यक्ती संख्या)

**IX.एकात्मिक , शेती पद्धती**

१. एकात्मिक शेती पद्धतींचा अवलंब करणारी कुटुंबे (सध्याची व प्रस्तावित)

२. शेळीपालन ( भूमिहीन कुटुंबे - सध्याची व प्रस्तावित)

३. परसातील कुक्कुटपालन (भूमिहीन कुटुंबे - सध्याची व प्रस्तावित)

४. रेशीम उद्योग (सध्याची कुटुंबे व प्रस्तावित कुटुंबे )

५. गोड्या पाण्यातील मत्स्यपालन (सध्याची कुटुंबे व प्रस्तावित कुटुंबे)

**X.आपत्कालिन पीक नियोजन आराखडा**

१. गाव पातळीवर हवामान अंदाज सल्ला मिळण्याची सुविधा

२. मागील पाच वर्षातील नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीची माहिती (बाधित शेतकरी, बाधित पिके, बाधित क्षेत्र)

३. मागील पाच वर्षातील पिकविमा माहिती (वर्षनिहाय शेतकरी, पिके व विमापात्र क्षेत्र, प्राप्त विमा संरक्षण)

**XI.शेतमाल मुल्यसाखळी वृद्धींगत करणे**

१. सद्यस्थितीतील शेतमाल विक्री व्यवस्था

२. गोदामांची उपलब्धता आणि उपलब्ध क्षमता

३. वाहतूक सुविधांची माहिती

४. महिला बचत गट, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी/ शेतकरी गट यांची संख्या व त्यांचे व्यवसाय (सध्याचे व प्रस्तावित)

५. सद्यस्थितीतील शेतमाल मुल्यसाखळीतील त्रुटी